महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -४४००२२

Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ईमेल- : vanarti.info@gmail.com

जा.क्र. वनार्टी /नागपूर/आस्था/ 265 /2026-27 दिनांक - 17/04/2026

## JEE/NEET/MHT-CET- 2026-28 परीक्षा पूर्व ऑनलाईन प्रशिक्षणाकरीता योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती- भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वनार्टी मार्फत JEE/NEET/MHT-CET Batch- 2026-28 च्या पूर्व तयारीसाठी मोफत ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्याकरीता विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत वनार्टी मार्फत विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण व टॅब देण्यात येईल.

**अ. योजनेच्या लाभासाठी पात्रता:-**

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विमुक्त जाती - भटक्या जमाती प्रवर्गातील असावा/असावी
3. सन- 2026 मध्ये इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सदर प्रशिक्षणाचा लाभाकरीता पात्र राहतील.
4. विद्यार्थी हा विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असावा.
5. विद्यार्थ्यांची निवड ही त्यांना इयत्ता 10 वी च्या परीक्षेत प्राप्त टक्केवारी तसेच सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षणानुसार करण्यात येईल.

**ब. अर्ज करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे:-**

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
3. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
4. इयत्ता 10 वी ची गुणपत्रिका
5. दिव्यांग असल्यास दाखला
6. अनाथ असल्यास दाखला

**क. आरक्षण :-**

**सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे:-**

| **अ.क्र.** | **सामाजिक प्रवर्ग** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 | विमुक्त जाती - अ (VJ-A) | 40% |
| 2 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 22.50% |
| 3 | भटक्या जमाती - क (NT-C) | 22.50% |
| 4 | भटक्या जमाती - ड (NT-D) | 15% |
| **एकूण-** | | **100%** |

**समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :-**

1) प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2) दिव्यांगाकरीता 4% जागा आरक्षित आहे.
3) अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

**ड. अर्ज कसा करावा :-**

1. वनार्टीच्या www.vanarti.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application for JEE/NEET/MHT-CET- Batch- 2026-28 Training"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

➢ **अटी व शर्ती :-**

1. अर्ज करण्याची अंतिम दि.30/05/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे तसेच निवडीची पद्धती बदलणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
4. अर्ज करणा-या विद्यार्थ्यांस इयत्ता 10 वी मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 60% व शहरी भागातील विद्यार्थ्यांना 70% गुण असणे अनिवार्य आहे.
5. सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यर्थ्यांना भविष्यात इयत्ता ।। वी ला विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा पुरावा व बोनाफाईड सर्टिफिकेट सादर करणे बंधनकारक राहिल, जे विद्यार्थी सदरचे कागदपत्रे सादर करणार नाही, अशा विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात येईल.
6. कोणत्याही माध्यमातून व अंतिम निवड प्रक्रियेच्या दरम्यान किवा प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास विडद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात येईल.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ वनार्टीच्या Call Centre वर संर्पक करावा: **संपर्क क्र** - +91 788 788 2026

-स्वा-

**(प्रशांत वावगे)**

व्यवस्थापकीय संचालक (प्र)

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था

(वनार्टी), नागपूर